Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I

**09**

# उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता

**प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील**
(इतिहास विभाग प्रमुख)
क्रांतिवीर नवल भाऊ कला महाविद्यालय, नवलनगर ता.जि.धुळे.

---

**प्रस्तावना:**

संपूर्ण विश्वातील मानवाचे आरोग्य हे पर्यावरणावरच अवलंबून आहे,त्यासाठी स्वच्छ आणि संतुलित पर्यावरण असणे गरजेचे आहे. जर पर्यावरण मानवी जीवनाला पोषक असेल तरच मानवी जीवन सुखी समृद्ध राहू शकते. अगदी प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये निसर्गाबद्दल अनेक धर्मग्रंथात जल वायू अग्नी जीव तसेच भूमी इत्यादींची पूजा अर्चा करण्यावर जास्त भर दिला आहे. मानव अगदी प्राचीन काळापासून या घटकांचे महत्त्व जाणून आहे. निसर्गाचे महत्त्व निसर्गातील साधन संपत्ती यांचा योग्य पद्धतीने उपयोग करून घेण्याचे ज्ञान अनादी काळापासून मानवाला होते. निसर्गाबद्दल मानवाच्या मनात आदर भाव होता व तो जीवन जगण्याच्या सामान्य कार्यपद्धतीशी जोडला गेला. त्यातून अप्रत्यक्षपणे त्याचे शिक्षणही मानवाला मिळत होते. मानव व मानवेतर प्राणी यांच्यातील फरक सांगताना सुप्रसिद्ध अमेरिकन समाजशास्त्रज्ञ वार्ड फरक सांगतात की, मानवेतर प्राण्याला बुद्धी नाही. मानवेतर प्राणी निसर्गाने ठेवले तसे राहतो मात्र मानव प्राणी आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करतो. मानव जसजसा बुद्धिमान होऊ लागला तसं तसा तो आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गावर मात करून आपले जीवन अधिकाधिक सुखी व संपन्न, आरामदायी करण्यासाठी पर्यावरणाची हानी करत आला आहे. तात्पर्य मानवप्राणीच पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरला आहे. प्रस्तुत लघुशोध निबंधातून पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता का आहे यावर अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**विश्वातील मानव व पर्यावरणाची हानी करणाऱ्या काही ठळक घटना:**

इसवी सन 1945 मध्ये अमेरिका या देशाने दुसऱ्या महायुद्ध काळात हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकले, सन 1954 मध्ये पॅसिफिक येथील मार्शल बेटावर अमेरिका देशाने टाकलेला पहिला हायड्रोजन बॉम्ब, सन 1956 मध्ये जपान मधील मिथाई मर्क्युरीची विषबाधा सन 1965 मध्ये युरोप खंडातील फ्रान्स या देशाने घेतलेल्या अनु चाचण्या, व्हिएतनाम युद्धाच्या वेळी अमेरिकेने वापरलेला एजंट ऑरेंज या वनस्पती नाशक द्रव्याचा वापर, इसवी सन 1984 मध्ये भारतातील भोपाळ येथील विषारी वायूची दुर्घटना, इसवी सन 1986 मध्ये सोवियत युनियनच्या युक्रेन जर बोबिल अनुभट्टीत झालेला स्फोट, सन 1989 मध्ये अमेरिकेचे एक्झाम वॉरडेज तेल वाहू जहाजाचा झालेला अपघात, सन 1991 मध्ये अमेरिका व इराक यांच्या युद्धात शेकडो इंधन विहिरींना लागलेली आग नानाविध अशा लहान मोठ्या अतिशय गंभीर स्वरूपाच्या धोकादायक घटनांमुळे जीवसृष्टीवर परिणाम होऊन सर्व जगाला याचा धोका पोहोचला आहे. मानव हा स्वार्थी असून सत्ता संपत्ती प्राप्त करण्याची प्रवृत्ती, निसर्गावर मात करण्याची महत्त्वाकांक्षा, नवनवीन विविध वैज्ञानिक शोध, वाढत्या गरजांसाठी पूर्ण औद्योगिक क्रांतीचा आधार, मोठ्या प्रमाणात जंगलतोड, मोठमोठ्या कारखान्यांची उभारणी, मोठमोठ्या धरणे सरोवरांची निर्मिती, कच्चामाल, इंधनाची गरज भागवण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात बेसुमार असा वापर, वाढती लोकसंख्या इत्यादींमुळे नागरिकीकरणाच्या प्रक्रियेचा वेग त्यायोगे शहरी लोकसंख्येत झालेली वाढ, पाण्याचा अतिवापर, अणुबॉम्ब, रासायनिक विषारी अस्त्रे, वाहतुकीच्या साधनांमध्ये झालेली झपाट्याने वाढ, इत्यादींमुळे जीवसृष्टीचा संवाद सुरू झाला पर्यायाने पर्यावरणात गंभीर स्वरूपाची समस्या निर्माण झाली आहे.

वर्तमान स्थितीत सर्वसामान्य माणसापासून ते राजकारण्यांपर्यंत पर्यावरण हा चर्चेचा, जिव्हाळ्याचा, चिंतेचा आणि चिंतनाचा विषय बनला आहे. तेव्हा विश्वातील पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षणाची नितांत अशी गरज निर्माण झाली आहे.

**पर्यावरणशिक्षणाचीआवश्यकता**

पर्यावरण समस्या ही कोणत्याही एका समूहाची,राज्याची अथवा देशापूरती नाही. ही समस्या स्थानिक नसून जागतिक स्वरूपाची आहे. सन 1972 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण विषयक पहिली जागतिक परिषद स्वीडन मधील स्टाक होम या शहरात भरली. या परिषदेमध्ये पर्यावरणीय समस्येवर मोठ्या प्रमाणात विचार मंथन घडून आले होते. तेव्हापासून विश्वातील मानव पर्यावरणीय समस्येला बऱ्या प्रमाणात महत्त्व देऊ लागला आजच्या घडीला तर जनसामान्यांचे देखील पर्यावरणीय समस्येकडे लक्ष वेधले जाऊ लागले आहे. जगामध्ये पाच जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. सर्व मानव जातीमध्ये

पर्यावरणाबद्दल जबाबदारीची भावना निर्माण व्हावी हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून पर्यावरण दिन साजरा केला जातो. सेवाभावी संस्था, शाळा, महाविद्यालये, निसर्गप्रेमी, पर्यावरण विभाग, यांच्यामार्फत विविध सेमिनार, चर्चासत्रे, इत्यादींचे आयोजन करतात. समाजामध्ये पर्यावरण जागृती करण्याचे प्रयत्न केले जातात. याशिवाय दूरदर्शन, आकाशवाणी, विविध वर्तमानपत्रे इत्यादींद्वारे पर्यावरणाचा ऱ्हास, पर्यावरणाचे महत्त्व याविषयी मोठ्या प्रमाणात जन जागृती केली जाते. असे असले तरी जगाच्या मानाने भारतामध्ये शिक्षणासंबंधी जास्त प्रमाणात जनजागृती झाल्याचे दिसून येत नाही

कोणत्याही राष्ट्राची प्रगती त्या देशातील दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर अवलंबून असते उच्च शिक्षण हे सामाजिक ,आर्थिक व वैज्ञानिक विकासाचे सशक्त साधन मानले जाते.वर्तमान काळात उच्चशिक्षणावर शिक्षणावर अधिक भर देणे काळाची गरज आहे. वर्तमान स्थितीत भारतामध्ये जवळपास 400 विद्यापीठे 2000000 च्या जवळपास महाविद्यालये आहेत. या विविध महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कोट्यावधीच्या घरात आहे. तसेच या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षक प्राध्यापकांची संख्या साडेचार लाखांपेक्षा जास्त आहे.भारतामध्ये आज विविध विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमधून मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षण दिले जाते. या उच्च शिक्षणाबरोबरच पर्यावरण शिक्षण देणे किंबहुना त्यावर अधिक भर देणे नितांत गरजेचे आहे. इसवी सन 1965 पासून पर्यावरण शिक्षण हा विषय शिक्षण क्षेत्रात मान्यता पावला. त्या अनुषंगाने पर्यावरण शिक्षण संदर्भात जगात अनेक संस्था विकसित झाल्या त्यामध्ये प्रामुख्याने UNESCO, UNEP, WHO, NCRT, NEERI यांच्या मार्फत शिक्षणात पर्यावरण संबंधित कार्यक्रम राबविला जाऊ लागला आहे.

**पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व :**

ओम पूर्ण मद: पूर्णमिद पूर्णात पूर्ण मुच्यतेI पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवा वशिष्यतेII पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करताना पर्यावरण संरक्षणासाठी वैदिक मंत्रामध्ये म्हटले आहे की, मानवाने आपल्या इच्छांना ताब्यात ठेवून निसर्गाकडून एवढेच घ्यावे ज्यामुळे ज्याच्या पूर्णत्वाला शेती पोहोचणार नाही. याचप्रमाणे वैदिक वाङ्मयातील यजुर्वेदात असे म्हटले आहे की, धाना लेखीरंतरिक्षा मा हिसी: पृथ्वीका संगर्वI अयम हितवा स्वधी तिस्ते तिजन:II प्राणिताप पहते सौभाग्या य I वीरोह सहस्त्रवलशा विवय रुहेम II अर्थातच तोडू नका, पाणी आणि पृथ्वीचे रक्षण करणे हा धर्म आहे, पृथ्वीकडून तेवढेच घ्या जेवढ्याचे पूर्तता केली जाऊ शकते. एकंदरीत पर्यावरणाच्या बाबतीत विचार मांडला जातो की " जर तुम्ही एका वर्षाचा विचार करीत असाल तर भाताची पेरणी करा, दहा वर्षाचा विचार करीत असाल तर झाडे लावा, आणि शंभर वर्षाचा विचार करीत असाल तर लोकांना शिक्षित करा" शिक्षण हा मानवी प्रगतीतील खूप महत्त्वाचा भाग आहे. यासाठी लोकांमध्ये सर्वप्रथम पर्यावरणाच्या संदर्भात जनजागृती करणे गरजेचे आहे. व्यक्तीला अगदी लहानपणापासूनच पर्यावरण संबंधी ज्ञान मिळाल्यास तो पर्यावरण संबंधी अधिक काळजी घेईल. कारण मानव व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधाच्या दृष्टीने पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण असून पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे.

उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी उच्च शिक्षणातील पर्यावरण प्रभावी जाणीव जागृती होण्यासाठी विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयात पर्यावरण अभ्यास हा विषय शिकवण्यासाठी तज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती केली जावी. वास्तवतेत उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना पर्यावरण हा ऐच्छिक विषय म्हणून दिला जातो. हा अभ्यासक्रम पदवी स्तरावर तीन वर्षे अभ्यासला जातो त्यामुळे स्वतंत्र ऐच्छिक विषयाचा सखोल अभ्यास केल्यामुळे त्या विषयातील अभ्यासक्रमाचे महत्त्व कळते म्हणून उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शाखेतील पदवी स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण हा विषय अनिवार्य करणे आवश्यक आहे. जेणेकरून पर्यावरण ही जागतिक स्वरूपाची कशी ज्वलंत समस्या आहे याची जाणीव होईल. शिक्षणाने मनुष्याची विचारसरणी बदलते, त्यामुळे त्याच्या कुटुंबाचा विकास होतो, सर्वश्रुत सूत्राचा वापर करून पर्यावरण शिक्षण या समस्या आणि त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षण प्रभावीपणे देणे नितांत गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व आणि भूमिका लक्षात घेता पर्यावरण विषयी ज्ञान मिळवणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. कारण मानवाचा संपूर्ण विकास हा पर्यावरणावरच अवलंबून आहे म्हणून पर्यावरण बद्दलची जाणीव जागृती संवर्धन संरक्षण आणि व्यवस्थापन या पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील तळागाळाच्या व्यक्तीपर्यंत पोहोचू शकतात आणि प्रत्येकाला पर्यावरण विषयी सकारात्मक दिशेने कार्य करण्याचे मार्ग त्यांना पर्यावरण शिक्षणानेच मिळवून देऊ शकतो. अति प्राचीन काळापासून ते आजपर्यंत पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व विचारात घेतले जाते. म्हणूनच उच्च शिक्षणात पर्यावरण शिक्षण पदवीच्या प्रथम वर्षापासून अनिवार्य केला जावा. देशाची पर्यावरण नीती, वाढत्या औद्योगीकरणाचे परिणाम, प्रदूषणामुळे नष्ट होत चाललेले वनस्पती प्राणी याची जाणीव करून देणे, जमीन, पाणी, वनस्पती या नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण आणि त्यांचे योग्य व्यवस्थापन हा उच्च शिक्षणात स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करून त्याची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. पर्यावरण समतोल

**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

राखण्यासाठी,जर्मनी,स्वीडन, कॅनडा यासारख्या देशात पर्यावरण रक्षण हीच राष्ट्रभक्ती आहे असे मानले जाते. आज विचार अगदी बालवाडी पासून ते उच्च स्तरापर्यंत या देशांमध्ये रुजवला जातो. आपल्या देशातही त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धन ही राष्ट्रभक्ती म्हणून जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. सुरेश फुले,**पर्यावरण अभ्यास,** विद्याभारती प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती २००५
२. **सामाजिक ज्ञान व सामाजिक जाणीव अधिष्ठान अभ्यास** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक २०००
३ डॉक्टर सुरेखा पंडित बापट, **भारताचा भौगोलिक अभ्यास,** साईनाथ प्रकाशन नागपूर २००३
४. Chand Jagdish, **Environmental education**, Anshul publiSingh house Delhi 2007.
५. प्राध्यापक ए पी चौधरी, सौ अर्चना चौधरी, **संपूर्ण पर्यावरण शास्त्र,** प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०११.
६. भांडारकर के एम, **पर्यावरण शिक्षण,** नूतन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९८
७. भोसले रमा, **शिक्षणातील बदलते विचार प्रवाह,** फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००९
८. वाय व्ही पाटील, शैलेश वाघ, सिद्धार्थ पाटील, **पर्यावरण अभ्यास,** अथर्व प्रकाशन जळगाव, २०१४.